# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सुष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेसनोट क्रमांक – ४०८/२०२४ दिनांक- ०५/११/२०२४

## प्रेस नोट

## "अवैध अग्नीशस्त्रे बाळगणारे व पुरवणारे आरोपीतांकडुन ०९ अवैध अग्नीशस्त्रे व २१ जिवंत काडतुसे जप्त करण्यात गुन्हे शाखा कक्ष- २ वसई यांना यश"

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयाचे परीसरातील अवैधरीत्या अग्नीशस्त्रे बाळगणा-या व्यक्तींवर कारवाई करणेबाबत मा. वरिष्ठांनी वेळोवेळी सुचना दिल्यावरुन गुप्त बातमीदारांकरवी अवैध शस्त्रे बाळगणा-या व्यक्तींबाबत माहीती प्राप्त करण्यात येत होती.

वसई पोलीस ठाण्याच्या अधिकारक्षेत्रात दि.२३/०७/२०२४ रोजी १६.५० वाजण्याच्या सुमारास वसई कोळीवाडा ते सुरुचीबागकडे जाणारे रोडवरील सनटेक सिटी गेटचे समोरील अर्धवट बांधकाम असणारे तिन मजली बिल्डींग, ता. वसई, जि. पालघर येथे आरोपीत ईसम नामे मोइन ऊर्फ जिलेबी अब्बुबयान सैयद, वय – ३० वर्षे, धंदा – गॅरेज रा. दमानिया अपार्टमेंट, वसई ता. वसई जि. पालघर याने आपले कब्जात देशी बनावटीचा पिस्टल व ३ जिवंत काडतूसे दुषीत हेतुने विनापरवाना बाळगल्याने पोहवा/०५०३३ जगदिश एकनाथ गोवारी, नेम- गुन्हे शाखा कक्ष - २ वसई यांनी दिलेल्या सरकारतर्फे फिर्यादी होवून दिलेल्या तक्रारीवरुन दि.२३.०७.२०२४ रोजी २१:३३ वाजता वसई पोलीस ठाणे येथे १७४/२०२४ भा.ह.का.कलम ३,२५(१)(ब) सह महाराष्ट्र पोलीस अधि.१९५१ चे कलम ३७(१)/१३५ अन्वये सदरचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दिनांक २३/०७/२०२४ रोजी गुप्त बातमीदाराकरवी वसई कोळीवाडा ते सुरुचीबागकडे जाणारे रोडवरील सनटेक सिटी गेटचे समोरील अर्धवट बांधकाम असणारे तिन मजली बिल्डींग मध्ये एका ईसमाच्या ताब्यात गावठी पिस्टल असल्याची माहीती प्राप्त होताच तात्काळ स्टाफ रवाना होवून सापळा रचुन प्रथमदर्शनी १ आरोपीतास अटक करण्यात आले. आरोपीत नं -१ यास ताब्यात घेतल्यानंतर त्याचेकडुन निरंतर कसुन तपास करीत अवैध अग्नीशस्त्रे खरेदी करणारे व पुरवणा-या आरोपीतांची माहीती घेवून गुजरात व उत्तरप्रदेश या परराज्यातील आरोपीतांचा गुन्हयातील सहभाग निष्पन्न करुन सदर गुन्हयाचे तपासा दरम्यान परराज्यात तपासपथके पाठवून ८ आरोपीतांना अटक करण्यात आले आहे.

**गुन्हयात अटक करण्यात आलेल्या आरोपीतांची नावे खालीलप्रमाणे :-**

०१) मोइन ऊर्फ युनुस ऊर्फ जिलेबी अब्बुबयान सैयद, वय ३० वर्षे, धंदा गॅरेज रा. दमानिया अपार्टमेंट, तळमजला, कोळीवाडा वसई ता. वसई जि. पालघर

०२) जावेद इकबाल खान, वय ३६ वर्षे, धंदा- वेल्डींग, रा.घर नं.६०४, साईदत्त नगर, वसई कोळीवाडा, वसई पश्चिम, ता.वसई जि.पालघर.

०३) मोहम्मद आरीफ ऊर्फ शाहरुख युसुफ खान, वय २९ वर्षे, धंदा डिलीव्हरी, रा.एफ सेक्टर, टी लाईन, रुम नं.०५,चिता कॅम्प, ट्रॉम्बे, मुंबई ४०००८८

०४) अंकित रामभुजारथ निशाद उर्फ अंकित पटेल वय- १९ वर्ष धंदा - शेती रा. हडही, ता.- साहगंज, जिल्हा- जौनपुर, पोलीस ठाणे- सराईख्वाजा, राज्य- उत्तरप्रदेश

०५) अमित विजय निशाद सध्या. रा. गणेश नगर, वडोदरा, राज्य –गुजरात मुळ गाव- मिरसातपुर, पो- बदलापूर, ता. जि. जौनपुर, राज्य- उत्तरप्रदेश

०६) अमितकुमार महाजन निशाद वय २४ वर्ष सध्या. रा. राधा कृष्णअपार्टमेंट , रुम नं- ६०२सघर्षनगर, चांदीवली, अंधेरी पुर्व मुळ गाव- पट्टेदयाळ, पो बदलापूर,ता- बदलापूर, जि. जौनपुर, राज्य- उत्तरप्रदेश

०७) आलम उर्फ अलीम झुलकरनैन खान वय २८ वर्ष रा. रुम नं ०८, काझी चाळ, किस्मत नगर, कुर्ला पश्चिम,मुंबई

०८) देवा अजयकुमार प्रजापती, वय – २३ वर्षे, धंदा – व्यवसाय, रा. प्रजापती बस्ती, नेवादा मुखलीसपुर, ता. बदलापुर, जि. जौनपुर, राज्य - उत्तरप्रदेश

अवैध अग्नीशस्त्राचे कारवाईमध्ये गुन्हयाचा तपास करीत अटक करण्यात आलेल्या ८ आरोपीतांकडुन ३,८३,३००/- रुपये किंमतीची **९ देशी पिस्टल, २१ जिवंत काडतुसे व ५ मोबाईल** असा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. तसेच नमुद गुन्हयामध्ये आणखी ईसमांचा सहभाग आहे किंवा कसे याबाबत तपास चालु आहे.

सदरची कामगिरी मा. श्री मधुकर पाण्डेय, पोलीस आयुक्त सो., मा. श्री. दत्तात्रय शिंदे, अपर पोलीस आयुक्त सो., मा. श्री अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), मा. श्री. मदन बल्लाळ सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली, गुन्हे शाखा-२ वसई युनीटचे पोलीस निरीक्षक शाहुराज रणवरे, सपोनिरी/ सुहास कांबळे, सपोनिरी/ सागर प्रकाश शिंदे,पोउपनिरी/ अजित गिते, सहाफौज/ रमेश भोसले, सहाफौज/संजय नवले, पोहवा/०००१५ रविंद्र पवार, पोहवा/०३०७६ प्रफुल्ल पाटील, पो.हवा/०३०५२ चंदन मोरे, पोहवा/ ०६०२५ सचिन पाटील, पो.हवा./**०५०३३** जगदीश गोवारी, पोहवा/ ०६१०७ रमेश आलदर, पोहवा/१२०४७ दादा आडके, पोहवा/१२०५३ सुधीर नरळे, पोहवा/१२०९७ अमोल कोरे, पोना/०३०३२ प्रशांतकुमार ठाकुर, पोशि/२३३९३ अजित मैड, पोशि/२३९४२ प्रतिक गोडगे, पोशि/२३३०३ राजकुमार गायकवाड, मसुब/रामेश्वर केकान, मसुब/अविनाश चौधरी, मसुब/शुभम गावकवाड तसेच सहाफौज/ संतोष चव्हाण नेम- सायबर शाखा यांनी उत्कृष्टरीत्या पार पाडली आहे.




-------ooooo-------